नि. फौ. ख. क्र. १६५/२०१८                                    निशाणी ४०

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र. ०४ यांचा जबाब</u>**
**<u>मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,</u>**

नाव – गजानन शालीग्राम सिरसाठ

वय – ४८ वर्षे, व्यवसाय मजूरी

पत्ता – यशवंत नगर बायपास अकोला ता.जि. अकोला.

**<u>सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती एस. व्ही. इंगळे यांचेमार्फत सरतपास सुरुः</u>**

१. फिर्यादी सरला माझी बहीण आहे. तिचे लग्न राहूल प्रल्हाद तेलगोटे सोबत अंदाजे १० –१५ वर्षापूर्वी झाले. सदर लग्नापासून तिला दोन मुले व एक मुलगी असे अपत्ये आहे. लग्नानंतर काही दिवस राहूल तेलगोटे ने तिला चांगले वागविले, त्यानंतर तिच्यावर संशय घेणे, मारपीट करणे नेहमी चालू होते. राहूल तेलगोटे शेती करतात. राहूल तेलगोटे व्यतिरीक्त तिला तिची सासू, सासरे आणि नंणदाचा त्रास होता. ते सर्व माझी बहिण शेतातून आल्यानंतर तिच्यावर संशय घेवून तिला मारपीट करीत होते. मारपीट करुन त्यांनी माझ्या बहिणीला घरी आणून सोडले त्यामुळे आम्ही महिला तक्रार निवारण समितीकडे तक्रार केली. महिला तक्रार समितीकडे त्यांच्यात समझोता होवून तिला परत सासरी पाठविले. समितीकडे त्यांनी लिहून दिले की, यापूढे तिच्यावर संशय घेणार नाही किंवा मारपीट करणार नाही. असे लिहून दिल्यावर माझी बहिण पुन्हा सासरी नांदायला गेली. नांदायला गेल्यानंतर आरोपींनी पुन्हा पूर्वीसारखीच वागणूक दिली. आजरोजी माझे भाचे आ.क्र १ राहूल तेलगोटे याच्याकडे आहेत. पुन्हा नांदायला गेल्यांनतर माझ्या बहिणीला त्रास झाल्याने तिने बाळापूर पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिला. तेव्हापासून माझी बहिण आमच्यासोबत राहते. आरोपी मुला मुलींना भेटू देत नाही. आम्ही कान्हेरी येथे गेलो असता त्यांनी आम्हाला शिवीगाळ केली. लग्नातील सोने व कपडे आरोपी यांच्याकडेच आहेत.

२. माझ्या बहिणीला आरोपी यांनी माहे जानेवारी २०१८ मध्ये मारहाण केली. मारहाण झाल्यानंतर माझ्या बहिणी सुनिल गवई आणि आशिष सुरवाडे यांना बोलावले होते. तिथे गेल्यांनतर त्यांनी विचारणा केली असता आरोपींनी माझ्या बहिणीला घेवुन जाण्यास सांगितले. आजरोजी सर्व आरोपी न्यायालयात हजर आहे.

सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एस.टी इंगळे यांचे मार्फत</u>**

३. पोलीसांनी माझ्याकडे विचारपूस केली होती. त्यांनी माझे बयान नोंदविले होते. त्यांनी माझे बयान मी सांगितल्याप्रमाणे नोंदविले होते. लग्नानंतर काही दिवस राहूल तेलगोटेने माझ्या बहिणीला चांगले वागविले, ही बाब मी माझ्या बयानात सांगितली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, सदर बाब मी आजरोजी पहिलांदाच न्यायालयात सांगत आहे. राहूल तेलगोटे हे शेतीचा व्यवसाय करतात, ही बाब मी बयानात सांगितली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, सदर बाब मी आजरोजी पहिलांदाच न्यायालयात सांगत आहे. राहूल सोबत तिला सासू सासरे व नंणदा यांचा त्रास होता ही बाब मी पोलीस बयानात सांगितली होती. तसेच ते सर्व शेतातून आल्यानंतर माझ्या बहिणीवर संशय घेवून मारहाण करीत होते, मारपीट करुन त्यांनी माझ्या बहिणीला घरी आणून सोडले म्हणून आम्ही महिला मंडळात तक्रार दिली, त्यांनी पूर्वीसारखीच वागणूक दिली, आशिष सुरवाडे व सूनिल गवई तेथे गेले असता आरोपींनी माझ्या बहिणीला घेवून जाण्यास सांगितले, ही बाब पोलीस बयानात सांगितली होती. सदर बाबी माझे पोलीस बयानात नसल्याचे कारण मला सांगता येणार नाही. आम्ही कान्हेरी येथे गेलो असता त्यांनी आम्हाला शिवीगाळ केली, ही बाब मी पोलीसांना बयानात सांगितली नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर बाब मी आजरोजी पहिलांदाच न्यायालयात सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझी बहीण तिच्या स्वइच्छेने तिच्या माहेरी राहते. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी आरोपीविरुध्द खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
समक्ष

PATIL DIPMALA MAHENDRA
Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2025.05.31 13:37:03 +0530

बाळापूर.
दि. २०/०५/२०२५

(श्रीमती डी. एम. पाटील)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर.

नि. फौ. ख. क्र. १६५/२०१८ निशाणी ४१

**सरकार तर्फे साक्षीदार क्र. ०५ यांचा जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव – आशिष दिनेश सुरवाडे

वय – २८ वर्षे, व्यवसाय वैद्यकीय प्रतिनीधी

पत्ता – यशवंत नगर वाशिम बायपास अकोला ता.जि. अकोला.

**सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती एस. व्ही. इंगळे यांचेमार्फत सरतपास सुरुः**

१. फिर्यादी माझी मावशी आहे. तिचे लग्न राहूल तेलगोटे सोबत अंदाजे पंधरावर्षापूर्वी झाले होते. तिला दोन मुले व एक मुलगी आहे. आरोपी क्र.१ त्यावेळी शेती करीत होते. आ.क्र १ माझ्या मावशीवर संशय घेवून तिला मारहाण करित होते. आ.क्र १ व्यतिरीक्त तिला सासू सासरे, आणि नंणदाचा त्रास होता. तिचे सासू सासरे व नंणदा आ.क्र १ यास माझ्या मावशीवर संशय घेण्यास सांगत होते. ते आरोपी क्र १ यास भडकवून देत होते. लग्नाच्या काही वर्षानंतर त्यांच्यात वाद होवून ते मावशीला घरी आणून सोडत होते आणि पुन्हा समझोता झाल्यावर नेत होते. महिला तक्रार समितीकडे तक्रार झाल्यानंतर आ.क्र १ यांनी पुन्हा संशय घेणार नाही, मारहाण करणार नाही अशी हमी दिली होती म्हणून माझी मावशी पुन्हा नांदायला गेली. त्यांनी लेखी हमी दिली होती. हमी दिल्यानंतर माझी मावशी तिच्या सासरी नांदायला गेली. दिनांक १५ जानेवारी २०१८ रोजी मला माझ्या मावशीने फोन करुन तिच्या सासरी बोलावले. म्हणून मी आणि सुनिल गवई असे मावशीच्या सासरी गेलो. तिथे गेल्यावर आम्हाला दिसले की, मावशी एका ठिकाणी बसली होती, तिच्या अंगावर मारहाणीचे वळ होते व तोंड सुजलेले होते, तिला बरोबर बोलता येत नव्हते. आ.क्र १ यांनी आम्हाला शिवीगाळ करुन माझ्या मावशीला घेवून जाण्यास सांगितले. त्यांनी आम्हाला सांगितले की, हिला येथे ठेवू नका, येथून घेवून जा. मी, सुनिल गवई आणि माझी मावशी असे आम्ही घरी परत आल्यानंतर तिला उपचारासाठी बाळापूर येथे पाठविले. उपचार झाल्यानंतर माझी मावशी बाळापूर पोलीस स्टेशनला गेली व तेथे जावून रिपोर्ट दिला. मावशीचे मुले आरोपींकडेच राहतात. माझी मावशी मुलांना भेटायला गेली असता आरोपी यांनी तिला मुलांना भेटू दिले नाही आणि

शिवीगाळ केली. साक्षीदार स्वताःहून सांगतात की, माझी मावशी मुलांना भेटण्यासाठी शाळेत गेली असता आरोपी यांनी शाळेचे मुख्याध्यापकांना सांगून तिला भेटू दिले नाही. मावशीच्या लग्नातील दागिने व कपडे आरोपी यांच्याकडेच आहेत. आरोपी आजरोजी न्यायालयात हजर आहेत.

सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एस.टी इंगळे यांचे मार्फत</u>**

२. पोलीसांनी माझे बयान मी सांगितल्याप्रमाणे नोंदविले होते. आ.क्र १ त्यावेळी शेती करीत होते, आ.क्र १ व्यतिरीक्त तिला सासू सासरे व नंणदा यांचा त्रास होता, सासू सासरे व नणंदा आ.क्र १ यास संशय घेण्यास सांगत होते आणि भडकवून देत होते, लग्नाच्या काही वर्षानंतर त्यांच्यात वाद होवून ते मावशीला घरी आणून सोडत होते आणि पुन्हा समझोता झाल्यावर नेत होते, मी आणि सुनिल गवई असे मावशीच्या सासरी गेलो. तिथे गेल्यावर आम्हाला दिसले की, मावशी एका ठिकाणी बसली होती, तिच्या अंगावर मारहाणीचे वळ होते व तोंड सुजलेले होते, तिला बरोबर बोलता येत नव्हते, आ.क्र १ यांनी आम्हाला शिवीगाळ करुन माझ्या मावशीला घेवून जाण्यास सांगितले, आम्ही घरी परत आल्यानंतर तिला उपचारासाठी बाळापूर येथे पाठविले, माझी मावशी मुलांना भेटण्यासाठी शाळेत गेली असता आरोपी यांनी शाळेचे मुख्याध्यापकांना सांगून तिला भेटू दिले नाही, मावशीच्या लग्नातील दागिने व कपडे आरोपी यांच्याकडेच आहेत, ही बाब मी बयानात सांगितली होती. या सर्व बाबी माझे बयानात नसल्याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगतो त्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही, फिर्यादी माझी मावशी असल्याने तिला मदत व्हावी म्हणून मी आरोपीविरुध्द खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

समक्ष

PATIL DIPMALA MAHENDRA

Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2025.05.31 13:37:09 +0530

(श्रीमती डी. एम. पाटील)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर.

बाळापूर.
दि. २०/०५/२०२५